# कंत्राटी पदभरती जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत जळगांव जिल्हयासाठी रिक्त असलेल्या पदांच्या पदभरती प्रक्रियेसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील पदांसाठी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. no | Name of Post | No. of Post & Category | Qualification | Remuneration (Per month Cosolidated) |
|---|---|---|---|---|
| 1 | Program Manager – Public Health | ST – 1,NT-B – 1,SEBC – 1,Open – 2<br>**Total – 5** | Any Medical Graduate With Full Time MPH / MHA / MBA in Health | 35000/- |
| 2 | MO – Ayush PG | SC – 1 | BAMS (MD) | 30000/- |
| 3 | MO (Male) - RBSK | SC – 2, ST – 1<br>**Total - 3** | BAMS / BUMS | 28000/- |
| 4 | MO (Female) – RBSK | SC – 2, Open – 2<br>**Total - 4** | BAMS / BUMS | 28000/- |
| 5 | Counsellor | SC – 1, ST – 1<br>**Total - 2** | MSW | 20000/- |
| 6 | Staff Nurse – Female | SC – 7, ST – 5, VJ-A – 1, NT-B – 4, NT-C – 4, NT-D – 2, SBC – 4, OBC – 12, SEBC – 6, EWS – 6, Open – 14<br>**Total - 65** | GNM / B.sc Nursing | 20000/- |
| 7 | Staff Nurse – Male | NT – B – 1, SBC – 1, OBC -1 SEBC – 1, Open – 2<br>**Total - 6** | GNM / B.sc Nursing | 20000/- |
| 8 | Nutritionist | SC – 1, VJ-A – 1<br>**Total - 2** | B.sc Nurtitionist, Home Science & Nutrition + with 2 year experience | 20000/- |
| 9 | STS | SC – 1 | 1) Bachelor's Degree OR recognized sanitary Inspectors course.<br>2) Certificate Course in Computer Operation (minimum 2 months)<br>3) Permanent two-wheeler driving license & should be able to drive two wheeler | 20000/- |
| 10 | Lab Technician | SC – 2, ST – 1, NT-C – 1, NT-D – 1<br>**Total – 5** | 12th Science + DMLT Course in recognize university. | 17000/- |
| 11 | Para Medical Worker | SC – 1, NT-C – 1, Open – 2<br>**Total - 4** | 12th Science + PMW Diploma | 17000/- |
| 12 | Pharmacist | SC – 1, NT-D – 1, Open – 1<br>**Total - 3** | 12th Science + D.pharm. | 17000/- |
| 13 | TBHV | VJ-A – 1, Open – 1<br>**Total - 2** | 1) Graduate in Science OR<br>2) Imtermediate (10+2) in science and experience of working as MPW/LHV/ANM/Health Worker Certificate OR Higher course in Health Education / Counselling OR<br>3) Tuberculosis health visitor's recognized course<br>4) Certificate course in computer Operations (minimum two months) | 15500/- |

Scanned with OKEN Scanner

## समांतर आरक्षणाचा तक्ता

| Name of Post | Category | Total Vacancy | General | Parallel Reservation-1 | Parallel Reservation-2 | Parallel Reservation-3 | Parallel Reservation-4 | Parallel Reservation-6 | Parallel Reservation-7 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Female 30% | Ex Service man 15% | Sport man 5% | Project Affected 5% | Part time Employees 10% | Disabled Person (PH) 4% |
| Staff Nurse - Female | SC | 7 | 5 | -- | 1 | -- | -- | 1 | -- |
| | ST | 5 | 4 | -- | 1 | -- | -- | -- | -- |
| | VJ - A | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | NT-B | 4 | 3 | -- | 1 | -- | -- | -- | -- |
| | NT-C | 4 | 3 | -- | 1 | -- | -- | -- | -- |
| | NT-D | 2 | 2 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | SBC | 4 | 3 | -- | 1 | -- | -- | -- | -- |
| | OBC | 12 | 7 | -- | 2 | 1 | 1 | 1 | -- |
| | SEBC | 6 | 4 | -- | 1 | -- | -- | 1 | -- |
| | EWS | 6 | 4 | -- | 1 | -- | -- | 1 | -- |
| | Open | 14 | 8 | -- | 2 | 1 | 1 | 1 | 1 |
| Lab Technician | SC | 2 | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- |
| | ST | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | NT-C | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | NT-D | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| Para Medical Worker | SC | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | NT-C | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | Open | 2 | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- |
| Program Manager - Public Health | Open | 2 | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- |

अटी व शर्ती -

वर्षाच्या दिनांक - २९/६/२०२६ पर्यंत राहील.

१)उपरोक्त पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती वर्षाच्या दिनांक - २९/६/२०२६ पर्यंत राहील.

२)अर्ज दिलेल्या नमुन्यात परिपुर्ण भरलेला असावा. अर्जामध्ये माहिती अथवा कागदपत्र अपूर्ण असल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३)केंद्र / राज्य शासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास उमेदवारांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा, नियम लागू नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

४)अर्ज सादर करतांना ज्या उमेदवारांच्या गुणपत्रकावर टक्केवारी दर्शविलेली नसेल व ग्रेड सिस्टिम असेल अशा उमेदवारांनी गुणपत्रकाची दोनही बाजुची छायांकीत प्रत जोडावी. तसेच जे उमेदवार रिपीटर असून पास झालेले असल्यास अशा उमेदवारांनी सर्व गुणपत्रक जोडणे आवश्यक राहील.

५)शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमुद करावा. खाजगी अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

६)एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावा. उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

७)उमेदवारांनी अर्ज हा एकाच प्रवर्गातुन करावा. दोन प्रवर्गातुन अर्ज केल्यास उमेदवार ज्या राखीव प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गाचा अर्ज ग्राहय धरण्यात येईल व दुसरा प्रवर्गातील अर्ज बाद करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

८)समांतर आरक्षणामध्ये अर्ज करतांना निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडण्यात यावीत.

९)अर्ज करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- चा डिमांड ड्राफट जोडणे आवश्यक आहे व डिमांड ड्राफट च्या मागे स्वत:चे नांव व पद स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राफट **"District Integrated Health & Family Welfare Society, Jalgaon"** यांचे नावे देय असावे. कोणत्याही कारणास्तव डिमांड ड्राफट न वठल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

१०)उमेदवारांची निवड ही फक्त गुणांकन पध्दतीने करण्यात येणार आहे. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

११)अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१२)अर्ज भरावयाच्या दिनांकास उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. रुग्ण सेवेशी संबधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वय वर्ष ६० नंतर अर्ज करणा-या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१३)पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असून त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

१४)उमेदवारांची खालील निकषानुसार गुणांकन यादी (**Merit List**) तयार करण्यात येईल व सदर मेरीटलिस्ट जिल्हा परिषद, जळगांव च्या www.zpjalgaon.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

१५)ज्या उमेदवारांचे गुणांकन यादीमध्ये समान गुण येतील त्या उमेदवारांच्या जन्मदिनांकानुसार जो ज्येष्ठ असेल त्या उमेदवाराला प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

| विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे = ६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरीक्त B.sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = ६०*२०/१००=१२) | २० गुण |
| संबधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | एकूण | १०० गुण |

१६)एमबीबीएस / कर्मचारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/ अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजु झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन), याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी. राजीनामा दिला असल्यास सक्षम प्राधिकारी यांचेकडुन राजीनामा मंजुर कार्यमुक्ती आदेश सोबत जोडणे बंधनकारक राहील.

१७)वरीलपैकी ज्या पदांना तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र आवश्यक आहे अशा पदांकरीता रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र किंवा नुतनीकरणाकरीता फी भरली असल्यास पावती जोडणे बंधनकारक राहील अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

१८)अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१९)राखीव प्रवर्गातील अथवा समांतर आरक्षणामधील उमेदवार न मिळाल्यास खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

२०)निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

२१)पद भरतीबाबत पदांची संख्या कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी शर्तीमध्ये बदल करणे इ. प्रकारचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांनी राखुन ठेवलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

२२)दिनांक २३.७.२०२० च्या पत्रानुसार दोनपेक्षा अधिक हयात मुले असणा-या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला नमुना भरुन अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

२३)उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींसह आपले अर्ज **राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग (नवीन बिल्डींग), जिल्हा परिषद, जळगांव,** येथे दिनांक १२/०६/२०२५ ते दिनांक - २४/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस सोडून) व्यक्तीशः / टपालाव्दारे सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

२४)सदरहु भरती प्रक्रियेबाबत सविस्तर तपशिल जळगांव जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर www.zpjalgaon.gov.in प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च व्यक्तीशः / दुरध्वनी / ई-मेल अथवा वर्तमानपत्रात जाहीरात दिली जाणार नाही.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -** १) नमुना अर्ज २) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ३) डिमांड ड्राफट (Only Demand Draft) ४) Leaving Certificate / Transfer Certificate / Birth Certificate ५) जातीचे प्रमाणपत्र ६)अर्जामध्ये नमुद शैक्षणिक अर्हतेबाबत गुणपत्रक ७) कौन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ८) शासकीय अनुभव असलेले प्रमाणपत्र ९) इतर. १०) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवर पृष्ठ क्र. लिहीणे आवश्यक.

सदस्य सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य व
कुटुंब कल्याण सोसायटी
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव

अध्यक्ष
जिल्हा एकात्मिक आरोग्य व
कुटुंब कल्याण सोसायटी
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव

Scanned with OKEN Scanner